मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक ०२ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • फेब्रुवारी - २०२३



# हसती दुनिया (मराठी)

अंक ०२ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • फेब्रुवारी - २०२३

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
स्वप्निल वि. ऱ्हाटवळ
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.




कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org



लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही


| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |


मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९





## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे १५
- आरोग्याचा मंत्र २४
- दिव्यवाणी २५
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३०
- सामान्य ज्ञान ४७
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष ०७
- भ्रमंती २८
- तेजस्विनी ३२
- स्वामी विवेकानंद : प्रेरक प्रसंग ३६
- विशेष ३७
- संतकथा ४२
- मत्स्यपुराण ४८
- विश्वजगत ४९








## कथा


- महर्षींचे मूल्य ०५
- खरं गाढव कोण ०८
- कृतज्ञ गरुड २०
- सोन्याच्या पादुका २२
- दृष्टांशी कसे वागावे ३४
- गर्वाचे घर खाली ४४
- कर्माने भाग्य बदलते ४५








## कविता


- सद्गुरु साकार १२
- माय मराठी आमुची ३५

# ‘स्वावलंबन’ हेच खरे शिक्षण !

चंदू चौथीत शिकत होता. एके दिवशी होमवर्क करताना तो बाबांना म्हणाला, “बाबा बाबा मला शाळेतले टीचर अजिबात आवडत नाहीत.” बाबांनी विचारलं, “असं का बरं?” चंदू म्हणाला, “टीचर आम्हाला उत्तरं सांगत नाहीत, ते म्हणतात, तुम्हीच शोधा. किती वैताग आहे ना! ट्युशन टीचर किती चांगले आहेत बघा, आम्हाला सगळी उत्तरं पटापट शोधून देतात-” त्यावर बाबा हसत म्हणाले, “बरं ते जाऊ दे. तुला गोष्ट ऐकायला आवडते ना?” गोष्ट म्हणताच चंदूची खळी खुलली. तो म्हणाला, “हो बाबा! सांगा ना गोष्ट!” बाबा गोष्ट सांगू लागले.

अनिल आणि सुनील नावाचे दोन तरुण काही कामानिमित्त शहराकडे जायला निघाले. त्याकाळी प्रवासाची साधनं नव्हती. त्यामुळे पायी प्रवास करावा लागे. अनिलच्या आईने त्याला चार दिवसाच्या भाकरी आणि चटणी अशी शिदोरी बांधून दिली. सुनीलच्या आईने मात्र त्याला भाकरी न देता भाकरी बनवण्याचं साहित्य सोबत दिलं. दोघेही मजल दरमजल करत नदीकाठी एका झाडाखाली थांबले. दुपारची वेळ होती. दोघांना भूक लागली होती. अनिलने आईने बांधून दिलेली शिदोरी सोडली आणि चटणी भाकरी मजेत खाऊ लागला. सुनीलने तीन दगड आणले. चूल पेटवली. त्यावर तवा ठेवला आणि आईने दिलेल्या पिठाच्या दोन भाकरी बनवून तोही खाऊ लागला. दुसऱ्या दिवशीही अनिल आईने दिलेल्या भाकरी आनंदाने खात होता. त्याला काहीच कष्ट नव्हते; पण सुनीलला मात्र स्वत: भाकर करण्याचे कष्ट घ्यावे लागत होते. अनिल खुशीत होता; पण तिसऱ्या, चौथ्या दिवशी अनिलचा आनंद मावळला. शिळी भाकरी त्याला खावेना. त्याची उपासमार होऊ लागली. सुनील मात्र रोज रोज गरमागरम ताजी भाकर बनवून खात होता.

गोष्ट सांगून झाल्यानंतर बाबा म्हणाले, चंदू! आता सांग बरं बाळ, इथं सुखी कोण ठरला, अनिल की सुनील? अर्थातच सुनील. सुनीलच्या आईने त्याला आयती भाकरी बनवून न देता भाकरी बनवायला शिकवलं जेणेकरून पुढे तो कोणावर अवलंबून राहू नये.

जो खरा गुरु असतो, तो आपल्या शिष्यांना स्वावलंबी बनवतो. आयती उत्तरं मिळाली तर मुलं आळशी बनतात. विषय समजून घेत नाही. घोकंपट्टी करुन पास होतात. ते खरं शिक्षण नाही. समजदार आईवडील सुद्धा मुलांसाठी फक्त संपत्ती जमा करून ठेवत नाही तर संपत्ती कमवायला शिकवतात. जेव्हा सारं काही आयतं मिळतं तेव्हा सुरुवातीला आनंद वाटतो; पण पुढे मात्र दु:खच वाट्याला येतं.

म्हणून स्वावलंबन हेच खरे शिक्षक आहे, कळलं ना?

- राजेंद्र थोरात •••



पौराणिक कथासार

# महर्षींचे मूल्य

स्कंद पुराणातील ही कथा आहे. एकदा महर्षी आपस्तंबांनी पाण्याच्या तळाशी बसून तपश्चर्या करण्याचा निश्चय केला. नर्मदा आणि मत्स्य नदीच्या संगमावर पाण्याखाली त्यांनी बारा वर्षापर्यंत तपश्चर्या केली. त्यामुळे परिसरातील जलचर प्राण्यांना ते खूप प्रिय वाटू लागले. महर्षींनाही साऱ्या जलचर प्राण्यांविषयी प्रेम वाटत होते.

एकदा काही मच्छीमार त्या ठिकाणी मासेमारी करण्यासाठी आले. त्यांनी जाळे टाकले आणि माशांच्या सोबत महर्षींनाही त्या जाळ्यामध्ये ओढून घेतले. जाळ्यात अडकलेल्या महर्षींवर जेंव्हा त्यांची नजर पडली तेंव्हा ते भीतीने थरथर कापू लागले. महर्षींची क्षमा मागू लागले.

मच्छीमारांकडून माशांचा खूप मोठा संहार होत असल्याने जलचर प्राणी कमी होऊन असंतुलन निर्माण होईल, शिवाय नकळत का होईना मच्छीमारांच्या हातून पापकर्मही घडत आहे हे पाहून मच्छीमारांबद्दलही त्यांच्या मनात दयाभाव निर्माण झाला. मच्छीमारांना पापमुक्त करून

जलचरांचाही उद्धार व्हावा यासाठी आपल्या बारा वर्षांच्या तपश्चर्येचं सारं पुण्य पणाला लावायचं त्यांनी ठरवलं.

एव्हाना महर्षी जाळ्यात अडकल्याची घटना सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली. त्या नगरीचा राजा नाभाग लगबगीने आपल्या मंत्रीगण आणि राजपुरोहितांसोबत नदीकिनारी आला. त्याने महर्षींची मनोभावे पूजा करून त्यांची क्षमायाचना मागत विचारले, "ऋषीवर, मी आपली काय सेवा करू जेणेकरून नकळत घडलेल्या या अपराधाबद्दल माझ्या नगरीतील प्रजेला क्षमादान मिळू शकेल?" महर्षी म्हणाले, "राजन! हे सारे मच्छीमार खूप कष्टाने आपली उपजीविका चालवतात, आज त्यांनी मला पाण्यातून बाहेर काढून माझ्यावर एक प्रकारे उपकारच केले आहेत. त्याबद्दल माझे जे उचित मूल्य असेल ते त्यांना दे." राजा नाभागने त्यांना एक लाख सुवर्णमुद्रा देऊ केल्या. त्यावर महर्षी म्हणाले, "राजन, माझे मूल्य केवळ एक लाख सुवर्णमुद्रा? हे योग्य नाही, माझे योग्य मूल्य असेल ते तू यांना दे." मग राजाने मच्छीमारांना एक करोड सुवर्णमुद्रा देऊ केल्या. ऋषी आपस्तंब मंदस्मित करत म्हणाले "राजन, अजूनही तू चुकतोयस. तू ब्रह्मज्ञानी संताचा सल्ला घे. सुवर्णमुद्रा, धन संपत्ती, तुझं राज्य हे काही माझं उचित मूल्य नाहीये." महर्षींनी सांगितल्याप्रमाणे राजा राजपुरोहितांना घेऊन महातपस्वी लोमश ऋषींकडे गेला. त्यांना सारी हकीकत कथन केली. त्यावर ते म्हणाले, "राजन! घाबरु नकोस, मी महर्षींचे योग्य मूल्य देऊन त्यांना संतुष्ट करतो. महर्षींच्या मूल्य रूपात तू साऱ्या मच्छिमारांना एक–एक गाय भेट म्हणून दे. ऋषी अमूल्य असतात. त्यांचे मूल्य आपण करू शकत नाही. त्याचप्रमाणे ऋषी परंपरेमध्ये गाय या प्राण्यालाही खूप महत्त्व आहे. तिचीही किंमत होऊ शकत नाही."

ऋषी लोमशजींचा हा सल्ला ऐकून राजा खूप प्रसन्न झाला. त्याप्रमाणे त्याने सर्व मच्छीमारांना गोदान केले. यामुळे महर्षी आपस्तंब प्रसन्न झाले. आपल्या पुण्याच्या बळावर त्यांनी सर्व मच्छीमारांना पापमुक्त करून जलचरांचाही उद्धार केला व आनंदाने तेथून प्रस्थान केले. गाय कामधेनू आहे. तिच्यामुळे दूध, दही, तूप हे सारे अमृततुल्य पदार्थ मिळतात. गाईचं शेण–मूत्र देखील औषधी आहे. गाय अनेक रुपात मानवमात्राला मदत करत असते. म्हणून गोसंगोपन करण्याची शिकवण आपल्याला भगवान श्रीकृष्णांनी तसेच ऋषी–मुनींनीही दिलेली आहे.

❖❖❖

## दिव्य वचन

जर परमात्म्याची कुठलीही जात नाही तर त्याची संतान असलेल्या मानवाची कुठली जात असणार आहे? सूर्याची जात नसते. मग त्याच्या किरणांची जात कशी असेल? एकतेचं रुप तेच पाहू शकतात, ज्यांनी एक प्रभू-परमात्म्याला जाणलेलं आहे. निसर्गातील अनेकतेत सौंदर्य आहे; परंतु मानवाने अनेकतेला अभिशाप बनवून ठेवले.

**-बाबा हरदेवसिंहजी महाराज**

# रामकृष्ण परमहंस



ईश्वरावर अगाध श्रद्धा असणारे, प्रत्येक स्त्रीचा आदर, मान – सन्मान राखणारे, स्वतःच्या पत्नीचा आईसमान आदर करणारे, मूर्तिमंत त्याग, वैराग्य, परोपकार, स्नेह, दया आणि कारूण्य या गुणांनी भरलेले ज्यांच्या नावाने रामकृष्ण मिशन स्थापन झाले आहे,स्वामी विवेकानंद यांचे गुरू भारतातील लोकप्रिय महान संत ते म्हणजे 'रामकृष्ण परमहंस' होय.

रामकृष्ण परमहंस यांचे मूळ नाव गदाधर चटोपाध्याय होते. त्यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८३६ साली बंगाल येथील हुगळी जिल्ह्यातील कामारपुकर गावात एका गरीब आणि रूढीवादी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खुदीराम चटोपाध्याय आणि आईचे नाव चंद्रमणीदेवी होते. या दांपत्याचे सारे आयुष्य सरळ, सोपे आणि धार्मिक होते. त्याचा प्रभाव बाल्यावस्थेतील गदाधरवरही पडला.

गदाधरांचे मन शाळेत कधी लागत नसे. पण चित्रकला आणि मातीच्या कलाकृती बनवणे याची त्यांना जणू दैवी देणगीच मिळाली होती. त्यांची स्मरणशक्ती अफाट होती. धर्मावर आधारित असणाऱ्या गोष्टी त्यांना सहजच आत्मसात व्हायच्या. त्यांचं निसर्गावर नितांत प्रेम होत. कधी–कधी ते नदीकिनारी एकांतात वेळ घालवायचे. वयाच्या सातव्या वर्षात त्यांच्या वडिलांचा स्वर्गवास झाला. घरखर्च चालविण्यासाठी त्यांचे मोठे भाऊ रामकुमार कलकत्त्यात जाऊन संस्कृत शिकवू लागले. काही काळानंतर त्यांची दक्षिणेश्वरी काली मंदिराचे मुख्य पुजारी म्हणून नेमणूक करण्यात आली. रामकृष्णही त्यांना मंदिराच्या कामात मदत करू लागले. पण १८५६ साली त्यांच्या भावाचा मृत्यू झाला आणि पौरोहित्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले. ते तन्मयतेने भक्ती करू लागले. ते भक्तित इतके मग्न झाले की लोक त्यांना वेडे समजू लागले. त्यांची ही देहातीत अवस्था ते 'परमहंस' पदाला पोचले याची ग्वाही होती. पुढे ते 'रामकृष्ण परमहंस' म्हणून ओळखले जाऊ लागले.

रामकृष्णजींच्या अगदी छोट्याशा उपदेशात समुद्र सामावलेला असे, जो प्रत्येक माणसात अमुलाग्र बदल करत असे. त्यांनी नरेंद्रनाथांना स्वामी विवेकानंद बनविले. ज्यावेळी स्वामी विवेकानंदानी तपस्या करण्यासाठी हिमालयात जाण्याची परवानगी मागितली, तेव्हा रामकृष्ण म्हणाले, "वत्सा आपल्या आजूबाजूचे लोक भुकेने तडफडत आहेत. चारही दिशांना अज्ञानाचा अंधार पसरलेला आहे. इथे लोक रडत–ओरडत

(पान ०९ वर)



कथा

# खरं गाढव कोण?

तेनालीराम बाजारातून जात होता. त्याला एक गरीब गृहस्थ गाढव विकायला उभा असलेला दिसला. तो प्रत्येकाला विनवणी करत होता; पण कुणीच त्याचं गाढव विकत घेत नव्हतं. दिवस मावळायला आला होता. तो तेनालीरामाला म्हणाला, “दादा! घ्या ना हे गाढव, फक्त दहा सुवर्णमुद्रा किंमत आहे.” त्यावर दुसरा गाढवविक्रेता म्हणाला, “अरे तुझं हे मरतुकडं गाढव कुणी फुकट देखील घेणार नाही.” हे ऐकताच तेनालीराम त्या गरीब व्यक्तीला म्हणाला, “घाबरु नकोस, तुझं हे गाढव मी एक हजार सुवर्ण मुद्रांना विकून देतो.” तेनालीने गाढवाच्या गळ्यात एक पाटी बांधली. त्यावर लिहिलं ‘हे अद्‌भुत गाढव आहे, किंमत फक्त एक हजार सुवर्ण मुद्रा.’ सर्व लोक त्याची चेष्टा करू लागले; परंतु तेनाली थेट राजवाड्यात गेला. राजाने

गाढवाच्या गळ्यातील ती पाटी पाहिली आणि तेनालीला विचारलं, की ह्या मरतुकड्या गाढवात असं काय विशेष आहे? त्यावर तेनाली म्हणाला, महाराज हे गाढव काही साधारण गाढव नाही. त्याच्यावर बसून बघितल्यानंतर तुम्हाला कळेल त्याची विशेषता! जो या गाढवावर स्वार होईल त्याला स्वर्गातील सर्व देवी देवतांचं दर्शन होईल. राजा म्हणाला, असं? मग ठीक आहे खात्री करून बघू या. तेनाली म्हणाला, महाराज, तुम्हाला जर खोटं वाटत असेल तर प्रत्यक्ष खात्री करून बघा. राजा म्हणाला, "प्रधानजी! तुम्ही घोड्यावर बसा आणि सांगा देवी देवतांचं दर्शन होतं का?" प्रधानजी लगेच गाढवावर स्वार व्हायला तयार झाले. तेवढ्यात प्रधानजींना मध्येच थांबवत तेनाली म्हणाला, महाराज एक अट आहे या गाढवावर बसून देवी देवतांचं दर्शन त्यालाच होऊ शकेल ज्याने आयुष्यात कधी चोरी केली नाही, लबाडी केली नाही, जो कधी खोटं बोलला नाही, ज्याने कधीच गैरकृत्य केलेलं नाही.

राजा म्हणाला, "आमचे प्रधानजी अगदी प्रामाणिक आहेत." प्रधानजी गाढवावर स्वार झाले आणि आकाशात सर्व बाजूला पाहू लागले; परंतु त्यांना काहीच दिसेना. राजा उतावीळ झाला होता; परंतु प्रधानजींचा गोंधळ उडाला. आपल्याला काहीच दिसत नाही असं सांगितलं, तर आपण चोर, लबाड आणि गैर कृत्य केलेले ठरतो. म्हणून ते म्हणाले, "महाराज, स्वर्गातील सगळ्या देवी देवता मला दिसत आहेत." प्रधानजी गाढवावरून खाली उतरल्यावर राजा गाढवावर स्वार झाला. त्यालाही आकाशात काहीच दिसलं नाही; परंतु प्रधानाला जर देवी देवतांचं दर्शन झालं आणि आपण सांगितलं की मला काहीच दिसलं नाही तर आपण चोर आणि लबाड ठरू म्हणून राजाही म्हणाला, होय! खरंच मला स्वर्गाचा नजारा दिसतोय.काय करणार! राजाचा नाईलाज होता. त्याने एक हजार सुवर्णमुद्रा देऊन मुकाट्याने ते मरतुकडं गाढव विकत घेतलं.

तेनालीने मोठ्या चातुर्याने ते गाढव एक हजार सुवर्ण मुद्रांना विकून दिले. ती गरीब व्यक्ती मनोमन विचार करू लागली, खरंच खरा गाढव कोण?... राजा, प्रधानजी की ते मरतुकडं गाढव?

❖❖❖

## रामकृष्ण परमहंस

(पान ०७ वरुन)

आहेत आणि तू हिमालयातील एका गुहेत समाधीच्या आनंदात मग्न राहशील? तुझा आत्मा हे स्वीकारेल?" नंतर मात्र स्वामी विवेकानंदांनी आपले सारे जीवन गोरगरिबांच्या सेवेत घालविले.

रामकृष्ण परमहंस म्हणायचे, "प्रत्येक मनुष्याच्या मनात ईश्वर असतो, तरीही सारे ईश्वरापासून दूर आहेत. यामुळे त्यांना अडचणींना तोंड दयावे लागते. त्यांनी लोकांना अध्यात्माच्या वाटेवर चालण्याबरोबरच मानवतेची सेवा करण्याचे धडे दिले. १५ ऑगस्ट १८८६ साली वयाच्या अवघ्या ५० व्या वर्षी घशाच्या कर्करोगाने त्यांचे निधन झाले. पण आजही त्यांची कीर्ती चारी दिशांना अवगत आहे.

❖❖❖




# प्रत्येक क्षणी प्रभूची जाणीव असावी

आपल्या आचरणात सहजता असावी. यासाठीच नेहमी प्रभू परमात्म्याची जाणीव, आठवण मनात राहावी.

ज्याप्रमाणे घड्याळाचा पेंड्यूलम सतत उजवीकडून डावीकडे हलत असतो. तसंच आपल्या देखील जीवनात परिस्थिती दोलायमान होत असते. कधी सुख तर कधी दुःख जाणवत असतं. त्यामुळे परिस्थिती कशीही असली तरी आपले आचार–विचार, व्यवहार सहज आणि स्थिर राहणे आवश्यक आहे. जेव्हा आपण सत्संगामध्ये बसलेले असतो, तेव्हा मन खूपच शांत आणि स्थिर असतं; परंतु ज्यावेळी आपण आपल्या नित्याच्या

कामकाजासाठी बाहेर पडतो तेव्हा कधी कधी मन अस्थिर होऊन जातं. तर मग ही काही क्षणाची स्थिरता कायमस्वरूपी कशी राहू शकेल? तर हे आपली विवेकबुद्धी किती जागृत आहे यावर अवलंबून असतं.

उदाहरणार्थ, एक प्रवासी ट्रेन मधून प्रवास करत आहे. त्याचवेळी दुसऱ्या व्यक्तीने त्याला धक्का मारला आणि काही कटू शब्दही बोलला. त्यावेळी पहिल्या व्यक्तीकडे दोनच पर्याय असतात. ती व्यक्ती विचार करू लागते, की आपली चूक नसताना त्या व्यक्तीने धक्का मारला, वर दोन वाईट शब्द देखील बोलला. तेव्हा त्याला एकतर चार शब्द ऐकवावेत, त्याच्याशी भांडण करावे, त्याला धडा शिकवावा आणि त्यामुळे संपूर्ण प्रवासाचा आनंद जाणार. दुसरा पर्याय म्हणजे त्याला संशयाचा फायदा द्यावा (benefit of doubt) कदाचित त्याचं काही महत्त्वाचं काम असेल म्हणून धक्का लागला असेल किंवा काही गैरसमज झाला असेल, त्याची मानसिक स्थिती ठीक नसेल. असा बेनिफिट ऑफ डाऊट देऊन आपला प्रवास शांतपणे करावा.

परिस्थिती कोणतीही असली तरी प्रतिक्रिया हा विकल्प आपल्याकडे असतो; परंतु जेव्हा आपल्याला ही जाणीव असते की आपल्या अंगसंग परमात्मा आहे, त्यावेळी आपली विवेकबुद्धी काम करत असते. अशावेळी जो निर्णय घेतला जातो तोच योग्य असतो. त्यावेळी आपली स्वतःची परीक्षा देखील होत असते, की आपण किती पाण्यात आहोत अर्थात ज्ञानाची किती समज आहे!

इतरांना दुखवून आपल्याला आनंद वाटत असेल तर याचा अर्थ स्पष्ट आहे की आपल्याला ज्ञान नीट कळले नाही किंवा ज्ञान कळूनही अजून वळत नाही. मानवी मूल्ये धारण करूनच आपण खरे मानव बनत असतो. रागाच्या भरात आपण कुणाला काही बोललो तर त्यामुळे नुकसान आपलंच होत असतं. कारण एक तर नात्यामध्ये कडवटपणा येतो. समोरच्या व्यक्तीचं हृदय देखील दुखावतं ते शब्द त्याच्या मनात कायमस्वरूपी कोरले जातात. म्हणून बाह्य गोष्टींनी आपण दुःखी होत नसतो तर आपण स्वतःच आपल्या दुःखाचं कारण होत असतो. यासाठीच क्षणोक्षणी या प्रभूच्या, जाणीवेत, स्मरणात राहावे.

❖❖❖

## अनमोल वचन

सद्गुरुकडून ब्रह्मज्ञान प्राप्त करुन जीवन-मुक्त शिष्यच खऱ्या अर्थाने मुक्त होतो.

– निर्मल जोशी

❖❖❖

मनुष्य जितका ज्ञानाच्या रंगात रंगून जातो तितकाच कर्माच्या रंगातही रंगून जातो.

–विनोबा भावे

कविता

# सद्गुरु साकार

युगायुगाला घडतो चमत्कार
निराकार ईश्वर होतो साकार
तारावया येतो सद्गुरु रुपात
प्रकट होतो मानवी देहात

सद्गुरु चरण पवित्र पावन
क्षणात होते पापाचे क्षालन
चरणी तयांच्या ठेविता भाव
जाती उद्धरुनी रंक अन् राव

गुरुकृपे जाई अज्ञान अंधार
ज्ञानबोधे उघडे मुक्तीचे द्वार
भवसागरी जरी दुःख अपार
सहज नेई हा उतरुनी पार

ज्ञान–कर्माचा संगम होतो
जगण्याला मग अर्थ येतो
वाणी मधुर अन् पवित्र मन
सुखमय होते मानवी जीवन

आदेश सद्गुरुचा पाळावा
आळस प्रमाद सदा टाळावा
भाव भक्तीशी घट्ट जुळावा
ज्ञानदीप अंतरी उजळावा

नित्य करावी सेवा–सत्संग
सत्कर्म व्हावे जीवनाचे अंग
संतचरित्रांचे करावे वाचन
अखंड व्हावे प्रभूचे स्मरण

कृतज्ञ असावे सदा प्रभूचे
घटाघटात पाहावे रुप हरीचे
द्वेष न करावा कधी कुणाचा
मार्ग अनुसरावा सदा प्रेमाचा



# दादाला विचारू या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्गुरु बाबाजींचे

प्रश्न : मोक्ष प्राप्तीसाठी जर परमात्म्याची ओळख होणे गरजेचे आहे, तर मग परमात्म्याची ओळख कशी होणार?

उत्तर : परमात्म्याची ओळख सद्गुरूच्या कृपेने होते. त्यासाठी अशा जाणकार महात्म्याचा (ब्रह्मज्ञानीचा) शोध घेतला पाहिजे, जो स्वत: परमात्म्याला जाणतो आणि त्याचा साक्षात्कार घडवून देऊ शकतो.

प्रश्न : आजकाल तर असंख्य गुरु बनलेले आहेत; पण परमात्म्याचा खरा जाणकार कोण हे कसं कळणार?

उत्तर : ब्रह्मज्ञानीची एकच निशाणी आहे ती म्हणजे तो जिज्ञासूला क्षणभरात प्रभू–परमात्म्याची ओळख करून देतो. फक्त अट एवढीच, की परमात्म्याला जाणण्याची जिज्ञासा घेऊनच त्या महात्माकडे जावे आणि आपली जिज्ञासा प्रकट करावी. जर त्या महात्म्याने क्षणभरात परमात्म्याची ओळख करून देत जिज्ञासा पूर्ण केली, तर तिथे अवश्य नतमस्तक व्हावे; परंतु या ऐवजी जर तो अन्य काही गोष्टींमध्ये अडकवत असेल तर तिथे न थांबता त्वरित बाहेर पडावे आणि आपली जिज्ञासा पूर्ण करणाऱ्या गुरुचा शोध चालू ठेवावा. आपली तळमळ जर मनापासून असेल तर लवकरच अशा ब्रह्मज्ञानी पुरुषाची भेट हा प्रभू परमात्मा घडवून आणतो आणि मनोकामना पूर्ण करतो.

प्रश्न : आपल्या धर्मग्रंथात देखील ब्रह्मज्ञानी साधुसंतांनी परमात्म्याचं वर्णन लिहून ठेवलेलं आहे. मग सद्गुरुची काय आवश्यकता?

उत्तर : जसं, मेडिकल सायन्सची पुस्तकं, त्यातील शब्द आपण वाचू शकतो; परंतु त्यातील रोगांची माहिती, औषधं याबाबतीत एखादा जाणकार डॉक्टरच समजू शकतो. तसं ब्रह्मज्ञानी संतांच्या शब्दातील भाव ब्रह्मज्ञानीच समजू शकतो. आपण आपल्या मुलांना जरी सर्व पुस्तकं घेऊन दिली तरीदेखील ती विद्या आत्मसात करण्यासाठी शाळेत पाठवतोच. तिथे प्रत्येक विषयाचा एक वेगळा शिक्षकही असतो.


तसंही आपल्या ब्रह्मज्ञानी साधुसंतांनी धर्मग्रंथात हेही लिहून ठेवलेलं आहे, की ब्रह्मज्ञानाची प्राप्ती अर्थात परमात्म्याची ओळख सद्गुरुकडूनच होत असते. म्हणून महापुरुषांचे आदेश प्रमाण मानून सद्गुरुला शरण जाणे क्रमप्राप्त ठरते.



# शब्दकोडे

# २९५

○ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )




## आडवे शब्द

१. हत्ती

५. बंगळुरु ही कोणत्या राज्याची राजधानी आहे ?

७. त्र्यंबक बापूजी ठोमरे या कवीचे टोपण नाव काय आहे ?

८. भारताचे पहिले उपपंतप्रधान ...... वल्लभभाई पटेल होते.

१०.हाताच्या कंकणाला....कशाला (म्हण)

१२.नामाच्या ऐवजी येणाऱ्या शब्दाला .....म्हणतात.

१४.भगवान श्रीकृष्णाची जन्मभूमी

१५.शिवरायांच्या...... खात्याचा प्रमुख बहिर्जी नाईक होता.

१६.मास्टर ब्लास्टर क्रिकेटपटूचे पूर्ण नाव : सचिन .....तेंडुलकर

## उभे शब्द

२. (पोलादपूर/ जबलपूर) हे शहर मध्य प्रदेशात आहे.

३. आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन फेब्रुवारी महिन्याच्या ........ तारखेला साजरा करतात.

४. हिमोग्लोबीन वाढण्यासाठी खावयाचे एक कंदमूळ

६. महात्मा गांधींची पत्नी : ........... गांधी

९. जीभेचा एक समानार्थी शब्द

१०.बिहू हे कोणत्या राज्याचे लोकनृत्य आहे ?

११.राजा दशरथ माता सीतेचा नात्याने .....होता.

१३.भगवान शंकराचे एक नाव

उत्तरे इतरत्र





## प्रश्न : मधमाशा संदेशवहन कसे करतात?



**उत्तर :** मधमाशा नृत्याच्या भाषेतून आपापल्या सख्यांशी बोलतात. मधमाशीला मधुसंचय असलेला भाग आढळल्यानंतर ती दोन प्रकारच्या नृत्यांनी आपल्या सख्यांना त्या स्थानासंबंधी माहिती देते. ते स्थान जवळ असेल तर एक नृत्य आणि लांब असेल तर वेगळ्या प्रकारचे नृत्य. मधुसंचयाचे स्थान पाहून आलेली मधमाशी सर्वप्रथम फुलातून आणलेले मधुरस आपल्या सख्यांना देऊन टाकते. मधुसंचयाचे स्थान शंभर मीटरपेक्षा कमी अंतरावर असेल तर मधमाशी गोलाकार नृत्य करते. नृत्य चालू असताना तिच्या सख्या तिची वारंवार चुंबने घेतात. स्पर्श गंधाच्या आणि नृत्याच्या या भाषेतून दिशा, अंतर आणि मधाचा गंध यातून सर्वांनाच कल्पना येते. एक मधमाशी आपले नृत्य थांबवून शोधासाठी बाहेर पडते आणि तिच्या सख्याही बाहेर पडतात. प्रत्येक मधमाशांची नृत्याची पध्दती ही वेगवेगळी आहे. अमेरिकेतील मधमाशा एच आकाराचे नृत्य करतात, तर रशियातील मधमाशा इंग्रजी आठ या आकाराचे नृत्य करतात.



## प्रश्न : कोंबडीचे पिल्लू अंड्यात श्वास कसा घेते?

**उत्तर :** जिवंत राहण्यासाठी सर्वांनाच श्वास घेण्याची गरज असते; परंतु अंड्यात श्वास घेणे अजब वाटते ना! कोंबडीच्या अंड्याच्या बाहेरच्या टरफलात सुमारे १०,००० (दहा हजार) छिद्रे असतात. ज्यातून पिलाला ऑक्सिजनचा पुरवठा होत असतो. तसेच या छिद्रावाटे आतील घाण व कार्बनडाय ऑक्साईड बाहेर पडत असते.

## प्रश्न : पेन्सिलीने लिहिलेले खोडरबरने खोडले जाते, म्हणजे काय होते?

**उत्तर :** पेन्सिलमध्ये शिसे असते. जेव्हा आपण कागदावर पेन्सिलीने लिहितो, तेव्हा या शिसाचे कण कागदावर चिकटतात. त्यामुळेच आपल्याला अपेक्षित ती प्रतिमा (इंप्रेशन) तिथे उमटते. खोडरबर त्यावरुन फिरविल्यानंतर हे शिशाचे कण ते खेचून काढते व लिहिलेले पुसले जाते. कागदावरचे लिहिलेले स्वच्छ करणारा रबर स्वत:ची स्वच्छता स्वत:च राखतो!






# आजोबा

चित्रांकन लेखन, रंग
अजय कालडा







काही दिवसानंतर पोटभर दाणे खाऊन धष्टपुष्ट झालेला चिमणा आपल्या घरट्याकडे परतला. त्याने पाहिले, आपल्या घरट्यात ससा आरामात बसलेला आहे. त्याला खूप राग आला. त्याने सशाला सांगितले, ऐतखाऊ कुठला! मी नाही हे पाहून माझ्या घरट्यात घुसून बसलास होय?
हे माझं घर आहे, चल निघ इथून!
ससा म्हणाला, कुठलं घर? आणि कसलं घर?हे घर तर आता माझं आहे. अरे विहीर, तलाव किंवा झाड सोडून कुणी एकदा गेलं तर तो आपला हक्क देखील गमावून बसतो, कळलं?
सशाचे म्हणणे ऐकून चिमणा म्हणाला, तुझ्याशी वाद घालून काही फायदा होणार नाही. चल, एखाद्या समजदार आणि बुद्धिमान व्यक्तीकडे जाऊ .तो जो निर्णय देईल त्याला घर मिळेल.


त्यांना एका झाडाखाली एक लबाड बोका पोथी वाचत बसलेला दिसला. चिमणा आणि ससा यांना तो खूप समजदार आणि विद्वान असावा असे वाटले.


चिमणा आणि ससा त्या बोक्याकडे आले. त्यांनी त्याला आपली समस्या सांगितली. ते म्हणाले, तुम्ही जो निर्णय द्याल त्याला घरटे मिळेल आणि जो खोटारडा असेल त्याला तुम्ही घरटे सोडून जायला सांगा.


ससा आणि चिमणा यांना पाहून बोक्याच्या तोंडाला पाणी सुटले त्याला भूक देखील खूप लागली होती. त्याने विचार केला, दोघेही चांगले धष्टपुष्ट आहेत. पोटभर भोजन मिळेल आणि खूप दिवस भोजनासाठी भटकावे देखील लागणार नाही.


बोका म्हणाला, मी तुमचा न्याय निवाडा करायला तयार आहे; परंतु मला तुमच्या कानात एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे. तुम्ही दोघेही माझ्या जवळ या.
दोघेही जवळ येताच बोक्याने पटकन सशाला पंजात पकडले आणि चिमण्याला तोंडात दाबून धरले.
बोक्याने दोघांचं काम तमाम केलं. दोघेही आपल्या मूर्खपणामुळे जीव गमावून बसले. त्यांनी स्वप्नात देखील विचार केला नसेल की शत्रुवर चटकन विश्वास ठेवणे किती धोकेदायक होऊ शकते!
तात्पर्य, दोघांच्या भांडणात तिसरा फायदा घेऊ शकतो हे नेहमी लक्षात ठेवायला हवे. बलवान आणि धूर्त शत्रूपासून नेहमी दूर राहण्यातच भलाई आहे.



# कृतज्ञ गरुड

पिंकी आजीला म्हणाली, “आजी आजी, गोष्ट सांग ना!” आजी म्हणाली, “बरं, सांगते हं बाळ!” पण आजी तू कोणाची गोष्ट सांगणार आहेस? तुझ्या गोष्टीचं नाव काय? आजी म्हणाली, “मी एका कृतज्ञ गरुडाची कथा सांगणार आहे.” पिंकी म्हणाली, “कृतज्ञ म्हणजे काय गं आजी?” आजी म्हणाली, “आधी गोष्ट सांगते. मग तूच सांग कृतज्ञ म्हणजे काय ते!” आजी गोष्ट सांगू लागली–

एके दिवशी एक शेतकरी शेतातील कामं आटोपून घरी निघाला होता. दुपारची वेळ होती कडक ऊन पडलं होतं, म्हणून तो थोडा वेळ झाडाखाली बसला. अचानक त्याचं लक्ष झाडावर गेलं. गरुडाचं पिल्लू पतंगाच्या मांज्यामध्ये अडकलं होतं. त्यातून सुटण्यासाठी धडपड करताना ते

जखमी झाले होते. शेतकऱ्याला त्याची दया आली. त्याने झाडावर चढून त्या गरुडाच्या पिलाची सुटका केली. त्याला घरी आणून झाडपाल्याचं औषध लावलं. त्याचं संगोपन केलं. हळूहळू गरुडाला शेतकऱ्याचा लळा लागला.

एके दिवशी शेतकरी शेतात काम करून थकला होता. दुपारची वेळ होती. सोबत नेलेली शिदोरी झाडाखाली बसून खावी म्हणून तो झाडाजवळ आला. खाली बसणार... तेवढ्यात गरुड त्याच्या डोक्यावर घिरट्या घालत आला. त्याने शेतकऱ्याच्या डोक्यावरची टोपी उचलून बाजूला फेकली. नंतर त्याच्या डोक्यावर पुन्हा चोच मारली. या प्रकाराने शेतकरी खूप संतापला. त्याला गरुडाचा खूप राग आला. आपण याचा जीव वाचवला आणि आज यानेच दुष्टपणा करत आपल्याला त्रास द्यावा? तो रागाच्या भरात दगड उचलून गरुडाला मारायला धावला. शेतकरी पुढे येताच ते प्रचंड झाड काडकाड आवाज करत जमिनीवर कोसळलं. शेतकऱ्याने पाहिलं, की गरुडाने दुष्टपणा केला नाही तर उलट आपले प्राण वाचवले. शेतकऱ्याने त्याला मनोमन खूप धन्यवाद देत आपल्या खांद्यावर बसवून घरी आणले.

तात्पर्य, ज्याने आपल्याला मदत केली त्याच्याविषयी नेहमी कृतज्ञ राहावे.

गोष्ट ऐकल्यानंतर पिंकी म्हणाली, "हं आता कळलं... कृतज्ञ म्हणजे एखाद्याने केलेल्या उपकाराची जाणीव ठेवणे." आजी हसून म्हणाली, "होय बाळ! आपणही प्रत्येकाच्या उपकाराची नेहमी जाणीव ठेवायची हं!"

❖❖❖

## अनेक देशांची बदललेली नावे

| जुने नाव | नवीन नाव |
|---|---|
| पर्शिया | इराण |
| बेचुआनालँड | बोटस्वाना |
| सयाम | थायलंड |
| सिलोन | श्रीलंका |
| गोल्ड कोस्ट | घाना |
| अबिसिनिया | इथियोपिया |
| मेसोपोटोमिया | इराक |
| हॉलंड | नेदरलँड |
| फॉर्मोसा | तैवान |
| क्रिस्टिना | ओस्लो |
| सॅलिसबरी | हरारे |
| पूर्व पाकिस्तान | बांग्लादेश |
| यवद्विप | जावा |
| मलाया | मलेशिया |
| ब्रह्मदेश | म्यानमार |
| कांपुचिया | कंबोडिया |
| टोगोलँड | टोगो |
| डच इस्ट इंडिया | इंडोनेशिया |
| संयुक्त अरब | इजिप्त |
| निप्पॉन | जपान |






# सोन्याच्या पादुका

शेठ करोडीमल ही एक धनाढ्य असामी होती; परंतु तरीही त्यांनी कधी कुठल्या मंदिरासाठी देणगी दिली नाही किंवा धार्मिक वास्तूच्या उभारणीसाठी वर्गणी दिली नाही. त्यामुळे लोक त्यांना नास्तिक आणि कंजूष म्हणत.

त्या गावामध्ये भगवान श्रीकृष्णाचं मंदिर होतं. गोकुळाष्टमीला पंचक्रोशीतील हजारो लोक दर्शनासाठी येत. मंदिर समितीने भगवान श्रीकृष्णाच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे ठरवले. त्याचप्रमाणे श्रीकृष्णाची सुंदर मूर्ती घडवून स्थानापन्न करायची आणि तिला सोन्याचा रत्नजडित मुकुट बनवायचा असे ठरले. संपूर्ण गावाने वर्गणी द्यायची हे देखील ठरले. मंदिर कमिटीचे पथक घरोघरी वर्गणी गोळा करायला रवाना झाले.

शेठ करोडीमल ही गावातील एकमेव श्रीमंत व्यक्ती असल्याने ते भगवान श्रीकृष्णासाठी रत्नजडित मुकुट सहज तयार करून देतील किंवा मोठी देणगी तरी देतील अशी मंदिर कमिटीच्या लोकांची अपेक्षा होती; परंतु नेहमीप्रमाणे करोडीमल यांनी वर्गणी देण्यास नकार दिला. ते म्हणाले, “तुम्ही तुमच्या भगवान श्रीकृष्णाला रत्नजडित मुकुट खुशाल चढवा; पण मला माझ्या कृष्णासाठी सोन्याच्या पादुका बनवायच्या आहेत. त्यामुळे मी काही वर्गणी देऊ शकत नाही.” लोकांना वाटलं शेठजी वर्गणी द्यावी लागू नये म्हणून पळवाट काढत आहेत. म्हणून मग मंदिर कमिटीचे अध्यक्ष म्हणाले, “शेठजी! यावेळी आम्ही तुमचं काही ऐकून घेणार नाही. तुम्ही आम्हाला फसवत आहात. खरंच तुम्ही सोन्याच्या पादुका बनवणार असाल तर त्या आम्हाला दाखवा नाहीतर सोन्याचा मुकुट द्या.” शेठजी म्हणाले, “बंधूंनो मी खोटं बोलत नाही; परंतु वेळ आली की तुम्हाला अवश्य त्या सोन्याच्या पादुका दाखवणार.”

काही दिवस निघून गेले. गावाच्या जवळच असलेल्या एका अपंग शाळेतील मुलांसाठी कृत्रिम अवयव तसेच अन्य साहित्य पुरवण्याचं काम शेठजी गेल्या अनेक वर्षांपासून करत होते; परंतु त्यांनी कधीही आपल्या नावाची प्रसिद्धी होऊ दिली नाही. गोकुळाष्टमीला जेव्हा मंदिराचा जीर्णोद्धार समारंभ झाला त्यावेळी अपंग शाळेतील सर्व विद्यार्थी तिथे आले. कृत्रिम पाय लावून त्यांनी सोहळ्यामध्ये सहभाग घेतला, भजनं म्हटली. त्या प्रसंगी शेठजी म्हणाले, “गावकरी बंधूंनो! मी तुमच्याशी खोटं बोललो नाही, तुम्ही तुमच्या कृष्णासाठी सोन्याचा मुकुट बनवला; पण त्याहीपेक्षा माझे हे बाळकृष्ण चालू शकत नव्हते. त्यांच्यासाठी हे सोन्यासारखे पाय आणणं अधिक गरजेचं होतं. तुम्ही मंदिराचा जीर्णोद्धार करा, मंदिर सजवा; पण त्याआधी ही चालती बोलती मंदिरं सजवली पाहिजेत. यांच्या निरागस चेहऱ्यावरची प्रसन्नता पाहून भगवान श्रीकृष्णांना नक्कीच परमानंद होईल, नाही का! संतांनी म्हटलेदेखील आहे, जी जी भूवरी शरीरे ती ती भगवंताची घरे।”

❖❖❖




**टी.व्ही. वर प्रत्येक मंगळवार व गुरुवार, सकाळी ७.०० ते ७.३० वाजेपर्यंत**

**सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या प्रवचनांचे प्रसारण**

# आरोग्याचा मंत्र



## आरोग्यदायी तीळ

आहारात, औषधात, पूजेच्या विधीत अशा वेगवेगळ्या ठिकाणी तिळाचा उपयोग होत असतो. तीळ पचण्यास जड, स्निग्ध, मधूरसाचा असून तुरट आणि कडू अनुरसही त्यात आहे. उष्ण आणि केश्य म्हणजेच केसांची वाढ करणारा आहे. तीळ उत्तम वातशामक असून कफपित्तप्रकोपक आहे. तिळाच्या तेलाने शरीराला रोज अभ्यंग केल्याने त्वचेची रुक्षता जाते. अंगकांती सुधारते, हाडांना बळकटी येते, प्रतिकारक्षमता वाढते आणि दिर्घायुष्य लाभते. हिवाळ्याच्या दिवसात तर तिळाचे तेल अतिशय उत्तम ठरते. आंघोळीपूर्वी पंधरा ते वीस मिनिटे आधी तिळाच्या तेलाने संपूर्ण शरीराला मसाज करावा. नंतर कोमट पाण्याने स्नान करावे.

त्वचा कोरडी होणे, भेगा पडणे, खाज सुटणे असा थंडीमुळे होणारा कुठलाही त्रास होत नाही. तीळ वाटून लोण्यात मिसळून खाल्ल्यास मूळव्याधीमध्ये रक्तस्त्राव थांबतो. तिळाच्या पानांचा व मुळाचा काढा करुन त्याने केस धुतल्याने आणि तेलाने शिरोभ्यंग केल्याने केस वाढण्यासाठी, काळे होण्यासाठी उपयुक्त ठरतो. तीळ हे उत्कृष्ट बुध्दिवर्धक असून, गाईचे दूध व तेल रोज सकाळी घेतल्यास बुध्दी सुधारते. कृष व्यक्तींनी रोज सकाळी तीळ चावून खाल्ल्यास, तिळाच्या तेलाने अभ्यंग केल्यास व गाईचे दूध प्यायल्यास शरीर धष्टपुष्ट होते. तिळाच्या तेलात सुंठ, लसूण, हिंग इत्यादी द्रव्य गरम करुन सांध्यांना मालिश केल्यास सर्व दुखणी त्वरीत थांबतात.



## गुणकारी बडीशेप

आपल्याकडे जेवल्यानंतर बडीशेप खाण्याची प्रथा आहे. ही प्रथा रुढ होण्यामागेही एक महत्त्वाचे कारण आहे. कारण बडीशेपही आरोग्यासाठी उपयुक्त मानली जाते. बडीशेपचा अर्क दहा ग्रॅम मधामध्ये मिसळावा. हे मिश्रण सेवन केल्याने खोकल्यापासून त्वरीत आराम मिळतो. पोटात दुखत असेल तर गरम केलेली बडीशेप चघळावी. त्यामुळेही आराम मिळतो. गॅसेस किंवा अपचनाची समस्या असेल तर रात्री झोपताना कोमट पाण्याबरोबर बडीशेप चूर्ण घ्यावे. त्यामुळे ही समस्या त्वरीत दूर होते.

अनेक व्यक्तींना हाता-पायाची जळजळ होण्याची समस्या त्रस्त करत असते. अशावेळी बडीशेपबरोबर तेवढ्याच मात्रेत चण्याची पूड करावी. हे दोन्ही एकत्र करुन जेवण केल्यानंतर पाच ते सहा ग्रॅम या मात्रेमध्ये सेवन करावे. त्यामुळे हातापायाची आग कमी होण्यास मदत होते. घसा बसला असेल तर बडीशेप चघळावी. त्यामुळे घसा साफ होण्यास मदत होते. कोरडे ढेकर येत असतील तर थोड्याशा बडीशेप पाण्यात घालून उकळाव्यात आणि त्या पाण्याचे सेवन करावे. त्याशिवाय दातांची दुर्गंधी, अपचनाची समस्या तसेच पचनक्रियेच्या तक्रारी दूर करण्यासाठी बडीशेप उपयुक्त ठरते. त्यामुळे घरोघरी बडीशेप असणे आवश्यक आहे.



# विशालता येण्यासाठी

जे वढे संत–गुरु–पीर–पैगंबर आले, त्यांनी कधीही समाजाला दूर लोटलं नाही, एकमेकांपासून तोडलं नाही. त्यांनी जोडण्याचंच काम केलं. त्यामुळेच त्यांचा एवढा लौकिक वाढला आहे. ज्यांची संकुचित भावना असते, ते कधीही उच्च पदाला जाऊ शकत नाहीत. एखाद्या कुंडीत जर वडाचं रोपटं लावलेलं असेल तर त्याचा मोठा वटवृक्ष होऊन त्याला हत्ती बांधता येईल अशी अपेक्षा करता येईल का? जोपर्यंत रोपट्याची मुळं त्या कुंडीच्या आत सामावलेली आहेत तोपर्यंत तो विस्तारणार नाही. आभाळाची उंची गाठू शकणार नाही. विशाल धरतीवरच अशी रोपं विशाल वृक्षाचं रुप घेऊ शकतात आणि अशा वृक्षाला कितीही मोठा हत्ती बांधला तरी तो हलू शकत नाही.

समजा, एखादया विहिरीच्या पाण्याची पातळी जमिनीपासून पाच फूट खोल आहे आणि त्या पाण्यावर बेडूक तरंगत आहे; जर त्या बेडकाने आकाशाकडे पाहिलं तर त्याला काय दिसेल? त्याला विहिरीचे कठडे दिसतील. थोडंफार निळं आकाश दिसेल. आता पाऊस पडला आणि विहिरीतील पाण्याची पातळी इतकी वाढली की ती जमिनीपासून फक्त दोन फूट बाकी राहिली. आता बेडूक जेव्हा वर पाहू लागेल तेव्हा त्याला कठड्याऐवजी विशाल आकाश दिसू लागेल. आकाशाची विशालता, त्याबरोबरच झाडं आणि पर्वतशिखरंही दिसू लागतील. आता जर विहिरीत आणखी पाणी साठलं. अगदी जमिनीच्या पातळीपर्यंत पाणी आलं. तर मात्र चहूबाजूचं दृश्य त्याला दिसू लागेल. विशाल आकाश, कुठेही भिंती नाहीत. असा विशाल नजारा पाहूनच विशालता येते. संकुचितपणा दूर होतो.

त्याच पद्धतीने जोपर्यंत आपण या विशाल निराकार सत्तेशी जोडले जात नाही तोपर्यंत आपल्या मध्ये विशालता येणार नाही.

❖❖❖



# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



श्रीजय साबळे



निधी कदम



अर्णव कदम



अर्णव मोहिते



असीम सावळकर



अणव घोडके



आदिराज घाडगे



गार्गी वाघमळे



विराज सांवत



प्रिया भानुशाली



दिव्यांशी परामणे



ग्रीष्मा वाघमोळे



वेदान सोनुने



सिद्धी जाधव



साक्षी गजरे



संस्कृती जाधव



आराध्या शिखरे



सार्थक पवार



ईश्वरी गजरे



विश्वास धायगुडे



वेदिका सोनुने



स्वरा पवार



रुनाली येरुडकर



अनुराग हुमणे



श्रीहिता कोतवडेकर



समर्थ शेंडे



सिमरन पारकर



अयान हुमने



# पळशीचा भुईकोट किल्ला

अहमदनगर म्हणजे सुंदर ऐतिहासिक वाडे व अनेक अप्रतिम गढ्या असणारा जिल्हा. याच नगर जिल्ह्यात पारनेर तालुक्यात पळशी या गावी होळकरांचे दिवाण रामजी यादव कांबळे–पळशीकर यांचा भुईकोट किल्ला आहे. या छोट्याशा किल्लेवजा गढीचे खरे वैशिष्ट्य म्हणजे भान हरपून जाईल असे लाकडातील नक्षीकाम केलेला पळशीकरांचा वाडा.

पुणे अहमदनगर रस्त्यावर शिरूर गाव ओलांडले की एक रस्ता डावीकडे राळेगणसिद्धीकडे वळतो. या रस्त्यावरच पारनेर हे तालुक्याचे गाव आहे. पुढे हा रस्ता टाकळी येथील ढोकेश्वराच्या लेणीजवळ नगर–कल्याण महामार्गाला मिळतो. टाकळी जवळ ढोकेश्वरची लेणी आवर्जून पाहावीत. पुढे वासुंदेमार्गे पळशीत पोहचावे. गावानजीकच किल्ल्याची सुस्थितीत असलेली तटबंदी आपले लक्ष वेधून घेते. तसा पळशीचा किल्ला भुईकोट म्हणावा इतका मोठा नसला तरी त्याच्या दगडी तटबंदी, बुरुज, दरवाजे अजूनही सुस्थितीत आहेत. पळशी गावाचा सर्व पसारा या दोन दरवाजांच्या आतच आहे. दरवाजाच्या दोन्ही





बाजूस शिलालेख कोरलेले आहेत. भव्य दरवाजातून आत गेल्यानंतर चौकोनी विटांचे बांधकाम असलेले तीन चार वाडे आपले लक्ष वेधून घेतात. त्यात पळशीकरांचा मुख्य वाडा म्हणजे काष्ठशिल्पाचा उत्कृष्ट नमुना. पूर्वी हा वाडा चार मजली होता असे सांगतात पण सद्यस्थितीत दोनच मजले तग धरून उभे आहेत. वाड्याच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत जाताच मध्ये चौक व चौसोपी वाडा आपल्या दृष्टीस पडतो. वाड्याच्या प्रत्येक खांबावर बारीक कोरीव काम केलेले आहे. या एकसंध खांबात कोरलेली फुलांची परडी व अंबारीसह असणारा हत्ती हे लक्ष वेधून घेतात. पळशीकरांचे वंशज रामराव कृष्णराव यांच्या ताब्यात सध्या हा वाडा आहे

वाडा पाहून झाल्यावर किल्ल्याच्या मागील प्रवेशद्वाराने विठ्ठल मंदिरात जायचे. नदीच्या काठावर बांधलेले हे मंदिर उत्तम नक्षीकाम केलेले आहे. मंदिराला सुंदर असा नगारखाना असून पाषाणात बांधलेल्या या मंदिरावर अनेक शिल्पे, देव देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. मंदिराचा गाभारा आणि शिखर हे पाहण्यासारखे आहे. मंदिराला सर्व बाजूंनी तटबंदी असून चारही कोपऱ्यात छोटे–छोटे बुरुज आहेत. हे मंदिर अंदाजे अडीचशे वर्षांपूर्वीचे असावे.

❖❖❖






गण्या : आजोबा, केकवर मेणबत्ती ऐवजी बल्ब का लावला?
आजोबा : अरे, आज माझा साठावा वाढदिवस आहे ना! मग साठ मेणबत्या कशा लावणार? म्हणून मग साठचा बल्ब लावला.

शिक्षिका : रावणाच्या लंकेला सोन्याची लंका असे का म्हणत?
बनी : कारण रावणाच्या आई–वडिलांनी लहानपणी लाडाने त्याचे नाव 'सोन्या' असे ठेवले होते.

छोटू : दादा, कावळा सरळ का उडतो?
दादा : कारण तो विचार करतो की उगाचच 'का–वळा?'

ट्राफिक पोलीस : (रिक्षावाल्याला) रिक्षा गॅसवर आहे का?
रिक्षावाला : नाही
पोलीस : मग डिझेलवर ?
रिक्षावाला : नाही
पोलीस : मग कशावर?
रिक्षावाला : हप्त्यावर आहे







पिंकी जर २५ रुपयाला पाव भाजी मिळते, तर शंभर रुपयाला काय मिळेल?
चिंगी : फुल भाजी मिळेल!



शिक्षक : (चिंटूला) बाळ! होमवर्क का नाही केला?
चिंटू : सर, जेव्हा मी होमवर्क करायला बसलो तेव्हा नेमकी लाईट गेली.
शिक्षक : अरे, मग लाईट आल्यावर का नाही केला?
चिंटू : होमवर्क करायला बसलो आणि पुन्हा लाईट गेली तर... उगाच माझ्यामुळे लाईट जायला नको, म्हणून नाही केला.



बन्या (पोस्टमनला) : इथे जुडगे साहेबांचं घर कुठे आहे?
पोस्टमन : मी तर हे नाव कधी ऐकलं नाही.
बन्या : अहो, इथेच मागच्या गल्लीत राहतात असं लिहिलंय
पोस्टमन : बघू बरं! (पत्ता वाचत) अरे, जुडगे नाही रे...जज (Judge) साहेब लिहिलंय.



बंड्या : पप्पा तुमच्या.....
पप्पा : बंड्या, किती वेळा सांगितलं, जेवताना बोलायचं नाही म्हणून...
बंड्या : ...पण पप्पा ऐका तर खरं!
पप्पा : चूप! बोलायचं नाही म्हणजे नाही. (जेवण झाल्यानंतर) बोल, बंड्या तुला काय सांगायचं होतं?
बंड्या : पप्पा तुमच्या आमटीत ना माशी पडली होती.

# राजमाता
# जिजाबाई शहाजी भोसले



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मदाती आई एवढीच जिजाऊआऊंची ओळख नाही. आपल्या सर्व आयुष्यामध्ये त्या शिवाजी महाराजांच्या गुरु, प्रेरणास्थान व मार्गदर्शक राहिल्या. त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने शिवाजी महाराजांना घडवले आणि सूर्याप्रमाणे दैदिप्यमान हिंदवी स्वराज्य उभारण्यात मोलाची साथ आणि मार्गदर्शन केले. क्षत्रिय कुलामधील सार्वभौम सिंहासनाधिष्ठ हिंदू जनता राज्याच्या रुपात आणि अखंड हिंदवी स्वराज्याचे वैभव पाहण्याचे भाग्य त्यांना त्यांच्या आयुष्यातच लाभले.

देवगिरीचे सम्राट यादवराव हे भगवान श्रीकृष्णांचे वंशज. या यादवरावांच्या घराण्यामधील पाच हजारी मनसबदार लखुजी जाधव आणि म्हाळसाबाई यांच्या पोटी खानदानी घराण्यात १२ जानेवारी सन १५९८ मध्ये आऊसाहेबांचा जन्म सिंदखेडराजा (बुलढाणा) येथे झाला.

लखुजी जाधव यांच्या ऐश्वर्यसंपन्न घराण्यात जन्मलेल्या जिजाबाईसाहेबांचा विवाह इ.स. १६१०-११ मध्ये तितक्याच तोलामोलाच्या भोसले घराण्यामधील शहाजीराजे भोसले यांच्याबरोबर देवगिरी (दौलताबाद) येथे झाला. शहाजीराजे हे मातब्बर, कर्तबगार, पराक्रमी सरदार निजामशाहीच्याच पदरी चाकरी करीत होते. शहाजीराजांबरोबर लग्न म्हणजे एका शूर, धाडशी आणि प्रसंगी धोका पत्करण्याची तयारी असलेल्या महत्त्वाकांक्षी वीर पुरुषाला जीवनभर साथ देण्याचे व्रत. पराक्रमी शहाजीराजे कधी आदिलशाहीत, कधी मोगलांकडे, तर कधी निजामशाहीत होणाऱ्या नोकरीने मराठ्यांना सुलतानी सत्तेत स्थिरता आणि मान नाही हे जिजाऊ यांच्या ध्यानात आले. शहाजीराजांचा स्वतंत्रतेचा प्रयत्न व प्रतिशाही स्थापून तीन वर्षे दिलेला लढा, त्यांनी केलेली धडपड वाया गेलेली जिजाऊंनी पाहिली.

शहाजीराजांची ही धडपड चालू असतानाच, १९ फेब्रुवारी फाल्गुन वैद्य तृतीया सूर्यास्ताच्या वेळी शिवनेरी किल्ल्यावर जिजाऊंनी एका पुत्राला जन्म दिला. त्याचं नाव ठेवलं शिवाजी. शिवाजी राजांची संपूर्ण जबाबदारी जिजाबाईंवर होती तर त्यांचा थोरला मुलगा संभाजी हा शहाजी राजांजवळ वाढला. जिजाऊंनी शिवरायांना गोष्टी सांगितल्या त्या पारतंत्र्यात सुरु झालेल्या आणि स्वातंत्र्यात संपलेल्या. सीतेचे हरण करणाऱ्या दुष्ट रावणाचा वध करणारा राम किती पराक्रमी होता, बकासुराचा वध करुन दुबळ्या लोकांची सुटका करणारा भीम किती

पराक्रमी होता. अशा प्रत्येक गोष्टीत त्यांनी पराक्रमी पुरुषाला भगवंताचे स्थान दिले, तर स्वातंत्र्याला ध्येयाचे स्थान दिले. प्रत्येक पराक्रमी पुरुषाच्या जीवनाचे ध्येय एकच असते, जे पारतंत्र्यात असतात, त्यांना स्वातंत्र्य मिळवून देणे ही त्यांनी शिवरायांना दिलेली शिकवण होती आणि त्यासोबत आपण समाज, तू आणि मीही पारतंत्र्यात आहोत ही प्रत्येक कथेनंतर दिलेली जाणीव होती. कर्तृत्व गाजविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्वराज्य स्थापन करणे ही शिवरायांची धारणा झाली, ती जिजाऊंच्या या संस्कारांमुळेच. राजांना घडवताना त्यांनी फक्त रामायण, महाभारतातील गोष्टीच नाही सांगितल्या तर शेजारी सदरेवर बसवून राजकारणाचे पहिले धडेही दिले. शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची ठिणगी टाकतानाच जिजाऊंनी त्यांना राजनीतीही शिकवली. शास्त्र-अस्त्राच्या प्रशिक्षणावर स्वतः त्यांनी बारकाईनं लक्ष ठेवलं. राजांच्या शिक्षणाची व संगोपनाची जबाबदारी पेलली आणि त्यांच्यावर संस्कार घडवले.

राजमाता जिजाऊ यांनी रयतेस दिलासा देऊन त्यांनी शिवराय यांच्याबद्दलची आत्मियता वाढीस





लावली. दादोजींच्या मृत्यूनंतर शिवराय जहागिरीचा कारभार स्वतंत्रपणे पाहू लागले. कर्तव्यकठोर, न्यायनिष्ठूर, प्रजावात्सल्य, शूर, प्रशासनकुशल अन् मुत्सद्दी राजा घडविण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते ते त्यांनी केले. आपल्या पराक्रमी पुत्राच्या प्रत्येक धाडसाला पाठिंबा देणाऱ्या आणि संकटात सर्वतोपरी मदत करुन धीर देणाऱ्या राजमाता जिजाऊ हे शिवरायांचे प्रेरणास्थान झाल्या. म्हणूनच शिवाजी महाराजांचा अभ्यास करताना त्यामधून जिजाऊसाहेबांना वगळताच येणार नाही.

मराठ्यांचे स्वतंत्र सिंहासन निर्माण करुन ६ जून १६७४ रोजी शिवरायांनी आपला राज्याभिषेक करुन घेतला आणि हिंदवी स्वराज्याचे पहिले छत्रपती, स्वराज्याचे धनी झाले. राजमाता जिजाऊंनी हा सुवर्णक्षण आपल्या डोळ्यांनी अनुभवला. राज्याभिषेकानंतर अवघ्या १२ दिवसानंतर जेष्ठ वद्य नवमी शके १५९६, १७ जून १६७४ बुधवार रोजी मध्यरात्री पाचाड येथे एक पत्नी, एक आई, एक गुरु, एक मार्गदर्शक, एक प्रेरणास्थान, एक कुशल शासक अशा सर्वगुण संपन्न वीर माता जिजाऊसाहेब अनंतात विलीन झाल्या.

❖❖❖

# दुष्टांशी कसे वागावे

एकदा सुभाषचंद्र बोस आणि एक गांधीवादी नेता यांच्यामध्ये चर्चा सुरू होती. तो काळ दुसऱ्या महायुद्धाचा होता. गांधीवादी नेता म्हणाला, "नेताजी! आपण जर इंग्रजांना युद्धात मदत केली तर ते आपल्याला स्वातंत्र्य देतील." त्यावर नेताजी म्हणाले, "चुकताय तुम्ही! ज्या इंग्रजांनी आपल्याला दडपशाहीने गुलामगिरीत ठेवले त्यांना जर आपण युद्धात मदत केली तर त्यांना भारतीयांविषयी धाक वाटणार नाही. उलट ते आपल्यावर अधिकच वर्चस्व गाजवतील. अशाने दुष्टांची खल प्रवृत्ती वाढत जाते. म्हणून भारतीयांनी इंग्रजांच्या बाजूने महायुद्धात उतरायला नको." परंतु खूप वेळ चर्चा करूनही ही गोष्ट गांधीवादी नेत्याच्या काही डोक्यात येईना. तेव्हा नेताजी म्हणाले, तुम्हाला मी एक गोष्ट सांगतो.....

एकदा एका माणसाला कुत्रा चावला. तो गृहस्थ औषधोपचारासाठी वैद्याकडे गेला. ग्रामीण भागात डॉक्टर नसल्याने वैद्यच झाडपाला लावून रोग बरा करीत. तेव्हा वैद्याने त्या गृहस्थाला सांगितले, की ज्या ठिकाणी तुम्हाला कुत्रा चावलेला आहे, त्या ठिकाणी भाकरीचा तुकडा बांधा आणि दोन तासाने तोच तुकडा त्या चावणाऱ्या कुत्र्याला खाऊ घाला. म्हणजे वेदना कमी होऊन तुमची जखम हळूहळू बरी होईल. त्या माणसाला वैद्यांचा हा सल्ला काही पटला नाही. तो म्हणाला, "वैद्यबुवा! तुम्ही म्हणता त्याप्रमाणे मी भाकरीचा तुकडा जखमेवर बांधेन आणि दोन तासाने तो तुकडा त्या कुत्र्याला देखील द्यायला माझी हरकत नाही; परंतु मी स्वतः जर भाकरीचा तुकडा घेऊन त्याला खायला दिला, तर त्याला असं वाटेल की माणसाला चावलं की भाकर मिळते. गुन्हा केला तरी बक्षीस मिळतं. मग तर तो भूक लागली की कोणालाही चावत सुटेल." वैद्यबुवा म्हणाले, "खरं आहे तुमचं! पण त्याच्यावर दुसरा मार्ग असा आहे, की तुम्ही स्वतः भाकर खाऊ न घालता ती दुसऱ्याकडून खाऊ घाला. म्हणजे तुमच्या म्हणण्याप्रमाणे कुत्र्याला बक्षीस मिळालं असं वाटणार नाही आणि त्याचा दुष्टपणाही वाढणार नाही."

ही गोष्ट ऐकून गांधीवादी नेता नेताजींना काय म्हणायचं ते समजून गेला आणि त्यांना प्रणाम करून काही न बोलता मुकाट्याने निघून गेला.

❖❖❖



# माय मराठी आमुची

(मराठी भाषा दिनानिमित्त)

मराठी आमुची मायबोली, मराठी आमुचा बाणा
मराठीच्या बोलीने, मातृभाषेचा फुटे पान्हा

बोलू मराठी गाऊ मराठी, अभिमान बाळगू मनी
राजभाषेचा दर्जा तिजला, शंका न घ्यावी कुणी

बाळ बोबडे बोलू लागता, मातेला आभाळ ठेंगणे
मातृभाषेतून शिक्षण घेऊ, माय मराठीस जपणे

गोडवा मराठी भाषेचा, जिव्हेवरी रेंगाळावा
सन्मान मराठी भाषेचा, दिवसागणिक वाढावा

वऱ्हाडी कोकणी भाषांचे, जरी सूर असती वेगळे
सप्तसुरांच्या उच्चारातून, प्रेमाचे फुटती उमाळे


अमृतातेही पैजा जिंके, ऐसा मराठीचा मान
सारे मिळून वाढवू या, सौंदर्य भाषेचे छान

वळवू तिकडे वळते, अशी मराठी भाषा
अर्थाचा अनर्थ नको, हीच एक अभिलाषा!

.... सौ. वासंती भोसले (सांगली)



# दीर्घायुष्याचे रहस्य



अमेरिकेत शिकागो धर्मपरिषद गाजवल्यानंतर अनेक जिज्ञासू स्वामीजींना भेटायला येत. काहीजण स्वामीजींना घरी आमंत्रित करत. त्यापैकीच एक होते रॉकफेलर. प्रचंड श्रीमंत! जगातील पहिला अरबपती! रात्रंदिवस एकच ध्येय फक्त पैसा. ही व्यक्ती कुठेही गेली तरी फक्त पैशांचाच विचार करणार. नातीगोती, मित्र, सगेसोयरे यांच्याशी त्यांना काही देणं घेणं नसे.

अशीच एक घटना १८९३ साली घडली. वयाच्या ५३ व्या वर्षी रॉकफेलर आजारी पडले. त्यांच्या डोक्यावरचे सारे केस झडून गेले. शरीर आकसू लागलं. अन्न गिळता येईना, थोडसं सूप पिऊन जगण्याची वेळ आली. झोपही लागत नव्हती. इतकंच नाही तर हसता रडता देखील येईना. अमेरीकेतील सर्व नामवंत डॉक्टरांना दाखवून झालं; पण उपयोग शून्य.डॉक्टरांनी शेवटचं सांगितलं, "आपण फक्त एक वर्षाचे पाहुणे आहात."

त्याचवेळी स्वामी विवेकानंदजी शिकागोमध्ये होते. रॉकफेलर यांच्या एका मित्राने सहजच त्यांना सल्ला दिला, की हिंदुस्थानातील एक संन्यासी इथं आलाय, आपण एकदा त्यांची भेट घ्यावी! रॉकफेलर सुरवातीला भडकले. ते म्हणाले, "असल्या गोष्टीवर मी विश्वास ठेवत नाही, तो संन्यासी काय करणार आहे?" पण काय कुणास ठाऊक दोन दिवसांनी मात्र ते स्वामीजींच्या भेटीला जायला तयार झाले.

स्वामीजी जिथं थांबले तिथं ते गेले. स्वामीजी लिखाण करण्यात व्यस्त होते. रॉकफेलर जाऊन थांबले. त्यांना अशी अपेक्षा होती, की मी एवढा मोठा माणूस, माझं मोठं आदरातिथ्य होईल; पण विवेकानंदांनी ढुंकूनही पाहिलं नाही! शेवटी रॉकफेलर स्वतःच म्हणाले, "मी उद्योजक रॉकफेलर" स्वामी म्हणाले, "बरं...मग?" "मला पाहून इथला राष्ट्राध्यक्ष सुद्धा उठून उभा राहतो." रॉकफेलर म्हणाले.

थोडा वेळ शांततेत गेला. शेवटी स्वामीजींनी बोलायला सुरुवात केली. ते म्हणाले, "तुम्ही मनाने फार बेचैन झाला आहात." आणि मग त्याच्या जीवनातील अशा काही घटना सांगितल्या, की ज्या त्यांच्याशिवाय कुणालाच माहिती नव्हत्या. त्या घटना ऐकून रॉकफेलर हैराण झाले! स्वामीजींचा त्यांच्यावर खूप मोठा प्रभाव पडला. एक तासांच्या चर्चेनंतर स्वामीजी त्यांना म्हणाले, "तुमच्या समस्येवर एकच उपाय आहे, तो म्हणजे तुम्ही दानधर्म केला पाहिजे."

(पान ३७ वर)

# मॅगसेसे पुरस्कार

पुरस्कार या सदरात आपण जागतिक स्तरावरील सर्वोच्च पुरस्कार म्हणजे ‘नोबेल पुरस्कार’ याची माहिती मागील अंकात घेतली.



आता पुढील पुरस्कार आहे ‘मॅगसेसे पुरस्कार’ हा आशियाचा नोबेल पुरस्कार म्हणून ओळखला जातो. मनीला येथील द रॅमन मॅगसेसे अवार्ड फाउंडेशनतर्फे दरवर्षी ३१ ऑगस्ट रोजी हा पुरस्कार दिला जातो. फिलिपाईन्सचे माजी राष्ट्राध्यक्ष रेमन मॅगसेसे यांच्या नावाने हा पुरस्कार सन १९५७ पासून सुरु करण्यात आला आहे. या पुरस्काराची रक्कम पन्नास हजार डॉलर इतकी असते. हा पुरस्कार प्राप्त करण्यासाठी वयोमर्यादा ही चाळीस वर्षाच्या आतील असावी. हा पुरस्कार सरकारी सेवा, समाजकारण, साहित्य, पत्रकारिता, शांतता आणि आंतरराष्ट्रीय संबंध या पाच क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना देण्यात येतो. या पुरस्काराची सुरुवात न्यूयॉर्कमधील रॉकफेलर भावंडांनी केली.

सन १९५८ मध्ये हा पुरस्कार प्राप्त करणारी पहिली भारतीय व्यक्ती आहे ‘विनोबाजी भावे.’ तसेच हा पुरस्कार प्राप्त करणारी पहिली भारतीय महिला आहे ‘मदर टेरेसा.’ यानंतर जवळपास ५६ भारतीयांना आतापर्यंत या पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यातील काही परिचित नावे अशी आहेत – जयप्रकाश नारायण, किरण बेदी, सत्यजित रे, एम. एस. सुब्बुलक्ष्मी, पांडुरंग शास्त्री आठवले, अरविंद केजरीवाल, प्रकाश आमटे, मंदाकिनी आमटे, त्याचप्रमाणे अलीकडे सोनम वांगचुक (थ्री इडियट सिनेमात यांची भूमिका आमिर खानने साकारली होती) भरत मोटवानी ही आहेत.

❖❖❖

## दीर्घायुष्याचे रहस्य

(पान ३६ वरुन)

रॉकफेलर यांना स्वामींजींविषयी श्रद्धा असल्याने, त्यांनी एक फाउंडेशनच काढलं, त्यातूनच पुढे मलेरिया, टीबी, यारख्या अनेक रोगांवर मोफत इलाज होऊ लागले. ते जगातील सर्वात मोठी दानशूर व्यक्ती म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे मात्र आश्चर्यच झालं. डॉक्टरांनी त्यांना एक वर्षाचे पाहुणे आहात म्हणून सांगितलं होतं ते रॉकफेलर ९८ वर्षे जगले तेही आनंदात!

आज जो जगातील सर्वात मोठी दानशूर व्यक्ती बिल गेट्स आपल्या पुस्तकात लिहितात, “मला डोनेशनची प्रेरणा रॉकफेलर फाउंडेशनमुळे मिळाली!”


असा होता स्वामीजींच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव!

संग्राहक : सुकदेव पाटील




# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा




तू करशील तयारी?
अरे सोडा रे !सगळी तयारी मी स्वतः करणार!
हे बघा मी सगळी लाईटिंग घेऊन आलेय. तुम्ही इथं उभे राहून बघा.
आता तुम्ही बघा, आपला पार्क कसा झगमग करतो ते!


अगं आई गं... मी पडले!
आत्ता काही फरक पडत नाही सगळी तयारी तर झालेली आहे.
चला चला आज आपण सगळे मिळून truth and dare (सत्य आणि धाडस) हा खेळ खेळूया.
किट्टी, आज तू हे सारं काम कसं केलंस?
मी सगळ्यांना नेहमीच त्रास दिलेला आहे; परंतु आज नवीन वर्षात मी एक प्रण करणार आहे, की यापुढे मी कुणालाही त्रास देणार नाही.


चला चला, बारा वाजले. आपण सारे मिळून एक केक कापू या.
कट्टीमध्ये आता किती बदल झालाय ना! सजावट देखील किती छान केलेली आहे. आपण तिला एक छानशी भेट द्यायला काय हरकत आहे?
हो हो! तू अगदी बरोबर बोललास.
किट्टी,बघ तुझ्यासाठी काय आणलंय ते!
वाव! मोंटू, माऊली, चिंटू तुम्ही सारे किती चांगले आहात! हे वर्ष माझ्या कायम  लक्षात राहील.

# संत कान्होपात्रा



महाराष्ट्रात अनेक विठ्ठल भक्त संतस्त्रिया होऊन गेल्या; परंतु संत कान्होपात्रा यांचं जीवन पूर्णतः भिन्न होतं. पंधराव्या शतकात पंढरपूरजवळील मंगळवेढे गावात शामा नावाच्या रूपसंपन्न गणिकेच्या(नृत्य– गायन करुन धनिकांचे मनोरंजन करणाऱ्या स्त्रिया) पोटी त्यांचा जन्म झाला. घरात सर्व सुखसोयी, ऐशोआराम असतानाही त्यांचे मन भोगविलासात अजिबात रमले नाही. बिदरच्या बादशहाच्या दरबारी आपल्या मुलीने नृत्य गायन करावे असे तिच्या आईला वाटे; परंतु तिचं मन विठ्ठलभक्तीकडे लागले होते.

संत कान्होपात्रा जेवढी रूपवान होती. तितकीच बुद्धिमानही होती. नृत्य व गायन या कला बालपणातच तिने अवगत केल्या होत्या. मंगळवेढ्याचा नगराध्यक्ष सदाशिव मालगुजर याला कान्होपात्राचं नृत्य– गायन बघण्याची इच्छा होती; परंतु अशा दुष्ट माणसासमोर मी नृत्य गायन करणार नाही असे तिने स्पष्ट सांगितले. त्यामुळे सूडबुद्धीने त्याने कान्होपात्राला पकडून आणण्यासाठी सेवक पाठवले; परंतु कान्होपात्रा डगमगली नाही. तिथून ती शिताफीने निसटली आणि जंगलात पळून गेली.रात्रभर देवाला आळवणी करत होती. पहाटे तिचा डोळा लागला.अचानक टाळ मृदंगाचा गजर ऐकून तिला जाग आली. वारकऱ्यांचा जत्था भजन गात पंढरपूरला जात होता. मंगळवेढा सोडून ती पंढरपूरच्या वारकऱ्यांमध्ये सामील झाली. पंढरपूरला आल्यावर काही दिवस मंदिरातच राहिली. आपल्या सुमधुर आवाजात ती स्वरचित अभंग गाऊ लागली. तिच्या गोड आवाजाने हजारो वारकरी तल्लीन होत. कान्होपात्रा देऊळ झाडून पुसून स्वच्छ करी. पंढरीच्या विठोबाने आपल्याला प्रत्यक्ष दर्शन द्यावे अशी तिला तळमळ लागली होती. तिकडे बिदरच्या बादशहाने कान्होपात्राला पकडून आणण्यासाठी सैनिक पाठवले.बिदरच्या सैनिकांचा विठ्ठल मंदिराभोवती गराडा पडला.कान्होपात्रा जर मंदिरा बाहेर आली नाही तर मंदिर उद्ध्वस्त करू अशी धमकी त्यांनी दिली. तेव्हा तिने विठ्ठलाकडे पाहून आर्त विनवणी केली, की बिदरच्या सैनिकांच्या हाती सापडून नरकात जाण्यापेक्षा मला तुझ्यामध्ये सामावून घे.तिची विनवणी ऐकून विठ्ठलाने तिला आपल्यामध्ये सामावून घेतलं.

संत कान्होपात्रांनी विठ्ठल चरणी देह ठेवल्यावर निसर्गाने देखील रौद्र रूप धारण केलं. महापूर आला, मंदिर जलमय झालं होतं.

अशा समर्पित विठ्ठलभक्त कान्होपात्रा यांनी अनेक अभंग रचले; परंतु ते लिहून ठेवायला कोणी नसल्याने काही मोजकेच अभंग वाचायला मिळतात.

❖❖❖

# बाल संत समागम





काशिमीरा



दिवा




वरळी



शिवडी




ठाणे





कथा

# गर्वाचे घर खाली

चिंटूच्या आजोबांनी त्याच्या बाबांना सांगितले, माधवा, या मोबाईलमध्ये मला जरा आवाजाचं सेटिंग करून दे रे! चिंटूच्या बाबांनी बराच प्रयत्न केला; पण त्यांना काही जमेना.आजोबांनी चिंटूला हाक मारली. दहा–बारा वर्षाचा चिंटू धावतच आला आणि म्हणाला, द्या आजोबा, मी करून देतो. असे म्हणून चिंटूने चुटकीसरशी सेटिंग करून दिली. आजोबांनी चिंटूची पाठ थोपटत त्याला खूप शाबासकी दिली आणि त्याचं कौतुक करत म्हणाले, जे काम तुझ्या बाबांना जमलं नाही ते तू किती सहज केलंस! आजोबांच्या शाबासकीमुळे चिंटू खूप खूष झाला. पुढे तो आजोबांना, त्याच्या आई–बाबांना मोबाईलमधील बारीक–सारीक गोष्टींबाबत मदत करू लागला.

परंतु पुढे मात्र चिंटूला आपल्या हुशारीचा गर्व वाटू लागला. मोठ्यांना जे जमत नाही ते आपल्याला जमतं याचा त्याला अभिमान वाटू लागला आणि कळत नकळतपणे तो आई बाबांशी उद्धटपणे वागू लागला. उलट उत्तर देऊ लागला. ही गोष्ट

(पान ४६ वर)





# कर्माने भाग्य बदलते

'अशक्य' शब्द माझ्या शब्दकोशातच नाही. हे सुप्रसिद्ध वाक्य कोणाचे?.....होय, अगदी बरोबर! फ्रान्सचा सम्राट नेपोलियन याचे. नेपोलियन बोनापार्ट याला कोणतीही गोष्ट अशक्य वाटत नसे. त्याचा आपल्या कर्तृत्वावर आणि प्रयत्नावर प्रचंड विश्वास होता. त्याच्या जीवनातील काही घटना प्रसंग पाहिल्यानंतर आपली खात्री पटते, की नेपोलियनने हे वाक्य आपल्या अनुभवातून उच्चारलेले आहे.

ही घटना त्यावेळची आहे, जेव्हा नेपोलियन एक सर्वसामान्य सैनिक होता. त्याचा स्वभाव आधीपासूनच अतिशय मेहनती आणि कष्टाळू होता. एकदा एक ज्योतिषी लोकांच्या हातावरील रेषा पाहून भविष्य सांगत होता. नेपोलियनही तिथे कुतूहल म्हणून गेला. आपला हात ज्योतिषासमोर धरत त्याने विचारले, "महाराज, माझ्या भाग्यात काय लिहिलंय ते सांगा." ज्योतिषी म्हणाला, "अरे, तुझ्या

हातावर भाग्यरेषाच नाही, तर तुझ्या भाग्याबद्दल काय सांगणार? मला तर तुझी चिंता वाटतेय.”

ज्योतिषाचे हे बोलणे ऐकून नेपोलियनला मोठा धक्का बसला. तो ज्योतिषाला म्हणाला, “महाराज! जरी माझ्या हातावर भाग्यरेषा नसली तरी मी माझ्या कर्तृत्वाने माझं भाग्य बदलून टाकेन” ज्योतिषी म्हणाला, “देव करो आणि तुझं बोलणं खरं होवो.” नेपोलियनच्या जीवनाला कलाटणी देणारा हा क्षण होता. त्याची महत्वाकांक्षा वाढीस लागली.त्याचा स्वतःच्या आत्मशक्तीवर पूर्ण विश्वास होता. अत्यंत कष्टाने अनेक अडचणींचा, संकटाचा सामना केला. ऑस्ट्रियाच्या अनेक मोहिमा त्याने यशस्वी केल्या. हळुहळू त्याला सैन्यात बढती मिळाली. ४५ वर्षाच्या आपल्या अल्प आयुष्यात वाटर्लूची लढाई सोडली तर सर्वच्या सर्व ५२ लढाया त्याने जिंकल्या. सामान्य सैनिकाचा तो पुढे सम्राट झाला. ब्रिटीशांना देखील त्याचा धाक वाटत असे. पराभव हा त्याला माहीतच नव्हता. एकदा एखादं ध्येय त्याने निश्चित केलं की तो त्याचा पूर्णतः पाठपुरावा करत असे. त्या कार्यात पूर्णपणे झोकून देत असे. असं म्हणतात की तो काही वेळा झोप देखील घोड्यावर बसल्या बसल्या घेत असे. म्हणजे स्वतःच्या विश्रांतीसाठी देखील तो वेळ दवडत नसे. त्यामुळेच तो प्रत्येक गोष्ट प्राप्त करत गेला आणि त्याने हे सिद्ध करून दाखवलं की जरी हातावर भाग्यरेषा नसल्या तरी कर्माने आपण आपले भाग्य बदलू शकतो.

❖❖❖

## गर्वाचे घर खाली

(पान ४४ वरुन)

आजोबांनी हेरली. चिंटूला आता ताळ्यावर आणलं पाहिजे, नाहीतर तो गर्विष्ठपणे वागून स्वतःचं नुकसान करून घेईल. रात्री झोपताना त्यांनी चिंटूला गोष्ट सांगायला सुरुवात केली.

आजोबा म्हणाले, फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. पूर्वी गावामध्ये विजेचे दिवे नसायचे. सूर्य मावळला की अंधार पडत असे. मग रॉकेलचे दिवे पेटवले जात. एका घरामध्ये रॉकेलचे दिवे नसल्याने मेणबत्ती पेटवून प्रकाश करण्यात आला. पुढे रोजच मेणबत्तीचा वापर होऊ लागला. एके दिवशी मेणबत्तीला वाटलं, की चंद्र–सूर्याचा प्रकाश जिथे पोहचू शकत नाही तिथे आपला प्रकाश पोचतो आपण चंद्र–सूर्यापेक्षा नक्कीच श्रेष्ठ आहोत असा तिला अभिमान झाला. त्याचवेळी घरातल्या लहान मुलाने खिडकी उघडली. वाऱ्याचा झोत आला आणि मेणबत्ती विझून गेली. पुढे पुढे तर गावात सुधारणा झाली. विजेचे दिवे आले. मग मात्र मेणबत्तीला कोणी विचारीनासं झालं. ती गर्विष्ठ मेणबत्ती एका कोनाड्यामध्ये धूळ खात पडली.

ही गोष्ट सांगून आजोबा म्हणाले, चिंटू आपल्याला ज्या गोष्टी येतात त्यांचा कधीही अभिमान करायचा नाही. उलट ईश्वराचे आभार मानत त्याने दिलेल्या बुद्धीचा, ज्ञानाचा, कलेचा, शक्तीचा उपयोग इतरांना मदत करण्यासाठी करायचा.

चिंटू मनोमन समजला. त्याने निश्चय केला, की आपल्याला जे मोबाईल–कॉम्प्युटरचं ज्ञान आहे त्याचा कधीच गर्व करायचा नाही. उलट प्रत्येकाला मदत करायची.

❖❖❖

# सामान्य ज्ञान



१) जगात जवळपास किती भाषा बोलल्या जातात?
अ) २२०० ब) ३००० क) ७००० ड) २७००



२) कोणत्या ग्रहाला सर्वाधिक उपग्रह आहेत?
अ) शनि ब) गुरु क) युरेनस ड )मंगळ

३) भारताचा शोध कोणी लावला?
अ)कोलंबस ब)वास्को द गामा क)अलबेरुनी ड )फाहियान

४) सालारजंग म्युझियम कोणत्या शहरात आहे?
अ) हैदराबाद ब) मुंबई क) कोलकाता ड) कानपूर

5) “तुम मुझे खून दो, मै तुम्हें आजादी दूंगा” असे आवाहन कोणत्या नेत्याने केले होते?
अ) लाला लजपतराय ब) तात्या टोपे क) चंद्रशेखर आझाद ड) सुभाषचंद्र बोस

६) उत्तराखंड राज्याची राजधानी कोणती?
अ) सिमला ब) डेहराडून क) लखनऊ ड) रायपूर

७) चलनी नोटांवर महात्मा गांधी यांच्या आधी कोणाचा फोटो टाकला जात होता?
अ) ताज महाल ब) लाल किल्ला क) अशोक स्तंभ ड)पं.नेहरु

८) रावणाचे खरे नाव काय होते?
अ) मेघनाद ब) दशानन क) दशग्रीव ड) लंकेश

९) २३ फेब्रुवारी हा दिवस निरंकारी मिशनमध्ये ‘गुरुपूजा दिवस’ म्हणून कोणत्या वर्षापासून साजरा केला जातो?
अ) २००३ ब) २००२ क) २००१ ड ) २००४

१०) ‘देवाहूनि गुरु थोर, जयाचे कृपेने भेटे रघुराजवीर’ असे कोणी म्हटले आहे?
अ) संत तुकाराम ब) रामदास स्वामी क) संत नामदेव ड) संत जनाबाई

उत्तरे इतरत्र

# ड्रॅगन फिश

ड्रॅगन फिश हे या माशाचे सर्वसाधारण नाव आहे. हा मासा बऱ्याच वर्गातील माशांशी साम्य दर्शवितो. या माशाची लांबी त्या त्या जातीप्रमाने कमी जास्त असते. परंतु शरीर एकंदरच लांबट आकाराचे असते. लांबीच्याप्रमाणात शरीराची रुंदी कमी असते. काळा ड्रॅगन फिश हा मॅलाकोस्टेड या कुळातील असून एक वैशिष्ट्यपूर्ण विविधता जपणारा असा हा मासा आहे. शरीरापेक्षा याचे डोके मोठे असून तोंड चपटे पण आकाराने मोठे असते. जबडा चेहऱ्याच्या टोकापर्यंत फाटल्याप्रमाणे मोठा असतो. तर दोन्ही जबड्यात बारीक लांबट आणि अणकुचीदार दातांच्या बऱ्याच ओळी असतात. ज्यामुळे भक्ष घट्ट पकडीत धरता येते. डोळे मोठ्या आकाराचे असतात. या माशाचे वैशिष्ट्य म्हणजे याच्या शरीरातून प्रकाश बाहेर टाकण्याची शक्ती त्याच्याजवळ असते. लाल, निळा आणि हिरव्या





रंगाचा प्रकाश तो पाण्यातील लाटांवर टाकू शकतो. समुद्राच्या पाण्यातील काही मासे असा प्रकाश टाकू शकतात. परंतु ते फक्त निळा रंगच प्रकाशित करु शकतात. ड्रॅगन फिश मात्र विविध रंगाचे प्रकाशाचे झोत टाकू शकतो. जो मानवी डोळ्यांना सहज दिसू शकतो. या प्रकाशाचा त्याला भक्ष पकडण्यासाठी आणि भक्षाच्या तावडीत न सापडण्यासाठी उपयोग होतो. प्रकाशात भक्ष स्पष्ट दिसल्यामुळे ते पकडणे त्याला सोपे जाते तर भरपूर प्रकाशात तो भक्षाला नक्की कुठे आहे हे दिसणे कठिण जाते. त्यामुळे शरीर प्रकाशित करण्याची संरक्षणासाठी आणि पोट भरण्यासाठी त्याला मिळालेली देणगीच आहे!

-संग्राहक : स्वप्निल ऱ्हाटवळ



# स्मॉल ग्रीन आऊलेट

**पतंगासारखं दिसणारं व आकाराने अगदी लहान असणारं हे फुलपाखरु. स्किपर जातीतील या फुलपाखराचा वावर भल्या पहाटे किंवा संध्याकाळी उशिरा असतो, त्यामुळे ते सहजपणे दिसून येत नाही.**

स्किपर ही जात फुलपाखरांची असली तरी त्यांचा एकंदर अविर्भाव हा पतंगासारखा असतो. त्यांच शरीर पतंगासारखंच जाडसर असतं व रंगही साधारणत: मातकट असतात. यांच्यातील काही जाती पतंगांसारख्याच पंख पसरवून बसतात, तर काही जाती मात्र फुलपाखरांसारख्या पंख मिटून बसतात. जगभरात स्किपर जातीची सुमारे ३५०० फुलपाखरं आढळतात. त्यातील ३२१ जातींची फुलपाखरं आपल्याकडे भारतात दिसून येतात. अशीच पतंगासारखी दिसणारी फुलपाखराची एक जात म्हणजे स्मॉल ग्रीन आऊलेट.

ही फुलपाखरं अतिशय लहान असल्याने त्यांचं छायाचित्रण करणं सहज शक्य नसतं. म्हणूनच चक्क रस्त्यात लोळण घेऊन त्यांचं छायाचित्रण करावं लागतं. हे रंगीत चमकदार फुलपाखरु म्हणजे स्मॉल ग्रीन आऊलेट. पिवळ्या-मातकट रंगाचं हे फुलपाखरु अतिशय आकर्षक दिसतं.

याचं वैशिष्ट्य म्हणजे याचं शरीर व पंख वेगळ्या रंगाचे असतात. याच्या पंखांवर काळ्या-पांढऱ्या रंगाचे उभे पट्टे असतात. हे पंख उडताना करड्या-राखाडी रंगाचे दिसतात. याचा वावर भल्या पहाटे किंवा संध्याकाळी उशीरा असतो, त्यामुळे ते सहजपणे दिसून येत नाही. यातील काही काही जाती मात्र दिवसासुध्दा उडताना दिसतात. यांचा एकंदर मातकट, मळखाऊ रंग, जलद उडण्याची पध्दत आणि अंधाऱ्या वेळी उडण्याच्या सवयीमुळे ही सहसा आढळून येत नाहीत. पण यातील काही काही जाती अगदी सहज दिसतात तर काही काही जाती शोधूनही सापडत नाहीत. तसेच ते केवळ अरुणाचल प्रदेश, सिक्कीम या भागातच आढळतं.

-संग्राहक : अंकित जाधव

# रंग भरा





## सामान्यज्ञान उत्तरे

१. ड
२. अ
३. ब
४. अ
५. ड
६. ब
७. क
८. क
९. अ
१०. ब

## शब्दकोडे २९५

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ ग | २ ज | | ३ ए | | ४ बी | |
| | ब | | ५ क | र्ना | ट | ६ क |
| ७ बा | ल | क | वी | | | स्तु |
| | पू | | ८ स | ९ र | दा | र |
| १० आ | र | ११ सा | | स | | बा |
| सा | | १२ स | र्व | ना | १३ म | |
| १४ म | थु | रा | | | १५ हे | र |
| | | | १६ र | मे | श | |

!! तू ही निरंकार !!

पूर्ण सदगुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी ।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी ।
पूर्ण सदगुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी ।
पूर्ण सदगुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी ।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी ।
पूर्ण सदगुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी ।



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा । घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा ।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है । ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है ।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा। उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा।
गुरू की जैं जैं जो करता है उसकी होती जैं जैं कार। गुरू की पूजा जो करता है उसको पूजे कुल संसार।

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

